# ज. ए. इ. ची प्राथमिक शाळा (सुभेदारवाडा), कल्याण (प.)

## * अहवाल सन २०१३–१४ *

जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटची प्राथमिक शाळा सुभेदारवाडा गांधी चौक, कल्याण आपला वार्षिक अहवाल सादर करीत आहे.

जून १९८५ साली जनरल इन्स्टिट्यूटची प्राथमिक शाळा कल्याण मधील सुभेदारवाड्यात सुरू झाली. सध्या शाळेच्या प्राथमिक विभागात १६ वर्ग असून ९१४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शाळेत एक मुख्याध्यापिका १६ शिक्षिका १ जादा शिक्षक, १ लेखनिक व १ सेविका कार्यरत आहे. तसेच संस्था पातळीवर १ संगीत शिक्षिका १ जादा शिक्षिका ५ सेविका कार्यरत आहेत. त्यामुळे शाळेचे शैक्षणिक नियोजन व्यवस्थित होते.

सन २०१३-१४ चे शैक्षणिक वर्ष १७ जून २०१३ पासून सुरू झाले. इ. १ ली ते ४ थी च्या सर्व विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत मोफत पाठ्यपुस्तके व कृतिपुस्तिका देण्यात आली.

आपल्या शाळेत गतवर्षापासून इ. १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांना संगणकाचे शिक्षण दिले जात आहे.

इ. १ ली चे ३ वर्ग, इ. २ री चे २ वर्ग व इ. ३ री चे २ वर्ग सेमी इंग्लिशचे घेण्यात येत आहेत.

पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल ८६% लागला असून ३ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली. कु. अमृता विवेक गोडक (बोर्डात १६ वी) कु. पियुष पांडुरंग हुलवले (बोर्डात २४ वा) कु. गौरीष शैलेश वझे (बोर्डात २९ वा) या विद्यार्थ्यांना सौ. प्रज्ञा मोने, सौ. चारुशिला वंडेकर, सौ. कल्पना पोतदार, सौ. पल्लवी गोखले या शिक्षकांनी मार्गदर्शन केले असून शाळेला संस्थेतर्फे दिली जाणारी 'कै. सुशांत वैद्य शिष्यवृत्ती ढाल' सलग तिसऱ्या वर्षीही आपल्या शाळेला मिळाली.

* मराठा मंदिर महाराष्ट्र ज्ञानपीठातर्फे घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल पुढीलप्रमाणे.

गणित - इ. ३ री ९९% , इ. ४ थी १००%

इंग्रजी - इ. ३ री १००%, इ. ४ थी १००%

* महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षा इ. ३ री माहे २८ मार्च १३ रोजी घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल ९६% लागला असून कु. उमा उल्हास वैद्य या विद्यार्थीनीने जिल्हा व केंद्रातून प्रथम व राज्यातून द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली. तसेच केंद्रातून दहा विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. कु. उर्शिता चंद्रकांत चौधरी (केंद्रातून दुसरी), कु. मधुरा अवधूत ओक- (चौथा), कु. गार्गी कर्वे-सहावी, कु. प्रचित संगवई-आठवा, कु. अवधूत कुलकर्णी- अकरावा, कु. मयुरेश गुजरे - पंधरावा, कु. सानिका पाटील - सोळावी, कु. समृद्धी जतकर- सतरावी, कु. साक्षी रानडे - एकोणिसावी, कु. आर्या जुवळे - एकविसावी,

या विद्यार्थ्यांना सौ. स्मिता फिरके, सौ. ज्योती पवार, सौ. स्वाती शेंडे, व सौ. मनिषा धोपटकर यांनी मार्गदर्शन केले.

स्वामी विवेकानंद यांच्या १५० व्या जयंती निमित्त डोंबिवली येथे घेण्यात आलेल्या पाठांतर स्पर्धेत

कु. प्रियंका वारघडे इ. २ री तील विद्यार्थीनीला उत्तेजनार्थ बक्षीस प्राप्त झाले.

✲ जूनमध्ये एम.पी.एस व स्कॉलरशिप परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांची सभा घेण्यात आली.

✲ २९ जून २०१३ ला इ. १ ली ते ४ थी च्या पालकांची सभा घेण्यात आली.

✲ दि. २१ व २२ ऑगस्ट २०१३ प्रथम घटक चाचणी घेण्यात आली.

✲ दि. १७ ऑक्टो. ते २२ ऑक्टो. पर्यंत प्रथम सत्र परीक्षा घेण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली अनेक शैक्षणिक उपक्रम व स्पर्धा घेण्यात येतात. सप्टेंबर २०१३ मध्ये संपूर्ण चार्तुमास या विषयावर रंजकपणे प्रतिकृती व तक्ते स्वरुपात मांडणी करून प्रदर्शन भरविण्यात आले.

शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार व्हावे म्हणून विविध सण, उत्सव साजरे केले जातात. दहीहंडी, भोंडला, मकरसंक्रांत तसेच विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्राभिमान जागृत होण्यासाठी स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन साजरा करतात. थोर नेत्यांच्या जयंती व पुण्यतिथीचे कार्यक्रम विविध उपक्रम व स्पर्धा घेऊन साजरे केले जातात. सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत महत्त्वांच्या दिवसांचे आयोजन केले जाते. २६ नोंव्हें. २०१३ रोजी शाळेत संविधान दिन साजरा करण्यात आला. लो. टिळक जयंतीचे औचित्य साधून २३ जुलै २०१३ रोजी इ. १ ते ४ थी च्या विद्यार्थ्यांच्या बालसभेचे आयोजन केले होते.

✲ लो. टिळक पुण्यतिथीनिमित्त इ. १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांच्या बौद्धिक स्पर्धा घेण्यात आल्या.

✲ ५ सप्टेंबर निमित्त शिक्षकांची स्मरणशक्ती स्पर्धा घेण्यात आली. त्यात खालील शिक्षकांना बक्षिसे प्राप्त झाली. १) कु. स्मितल बनसोडे, २) सौ. ज्योती पवार, ३) सौ. ज्योती पाटील, सौ. पल्लवी गोखले, सौ. शमिका खटावकर - उत्तेजनार्थ

✲ शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थी झाले शिक्षक हा कार्यक्रम घेण्यात आला. त्या इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक, शिक्षक, सेवक इ. भूमिका बजावल्या.

✲ साई समर्थ संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धेत कु. अनुराग चव्हाण या विद्यार्थ्याला रोख २५० रुपये व द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

✲ स. वा. जोशी विद्यालय डोंबिवली या शाळेच्या रौप्य महोत्सवानिमित्त आयोजित देवीची आरती म्हणणे या स्पर्धेत कु. अनुष्का गांगल प्रथम, साक्षी जोशी हिला तृतीय क्रमांक प्राप्त झाला. तसेच प्लॅस्टिक बाटली सजावट या स्पर्धेत कु. प्राची वैद्य हिला प्रथम क्रमांक प्राप्त झाला.

✲ संस्थेतर्फे कै. गुरुवर्य श्री. श्री. ज. बापट स्मृती वक्तृत्वस्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. इ. १ ली व २ रीतून अनुष्का गांगल इ. १ ली (तृतीय क्रमांक), साक्षी संजय जोशी तृतीय क्रमांक, (इ. ३ री व ४ थी तून) द्वितीय क्रमांक - कु. उमा उल्हास वैद्य

✲ पब्लिकेशन (इंडिया) लिमिटेड संस्था नवनीत तर्फे आयोजित केलेल्या चित्रकला स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांना पारितोषिके प्राप्त झाली. गट क्र. १ (इ. १ ली ते ३ री) कु. जितेश मुकादम, कु. सिद्धी भोईर,

कु. रोशनी जोरवर, कु. विघ्नेश परब, कु. राज भोईर, कु. सिद्धेश घुडे, कु. जान्हवी वानखेडे.
गट क्र. २ (इ. ४ थी) कु. मधुरा अवधूत ओक

✻ स्त्री शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या मातृदिनानिमित्त निबंध स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांनींना बक्षिसे मिळाली. कु. उमा उल्हास वैद्य (इ. ४ थी) - प्रथम क्रमांक, कु. सिमरन जितेंद्र पिंपळे (४ थी) द्वितीय क्रमांक

✻ अथर्व ट्रस्ट डोंबिवलीतर्फे घेण्यात आलेल्या सन-२०१३ या वर्षात रंगभरण स्पर्धेत कु. उमा वैद्य स्टेट गुणवत्ता कला गौरव व रु.१००/- रोख पारितोषिक मिळाले. कु. दिव्या वझे स्टेट गुणवत्ता कला गौरव व रु.१००/- रोख पारितोषिक सुंदर हस्ताक्षर स्पर्धेत मिळाले.

✻ कु. मंदार भोर याला चित्रकला स्पर्धेत दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस व रु.५००/- रोख पारितोषिक मिळाले.

✻ सौ. ज्योती पाटील व सौ. कल्पना पोतदार यांना कलाभूषण पुरस्कार व रु. ३५०/- रोख पारितोषिक मिळाले. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका यांनाही कलाभूषण पुरस्कार व शाळेला आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला.

✻ संत राममारुती पुण्यतिथी उत्सवानिमित्त दरवर्षीप्रमाणे यावर्षीही इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांनी अथर्वशीर्षाचे पठण केले.

✻ अंतरंग पुणे तर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी भरघोस यश प्राप्त करून विविध पुरस्कार मिळविले.

✻ शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. प्रज्ञा मोने यांना कलाभूषण पुरस्कार आदर्श मुख्याध्यापक स्मृतिचिन्ह सर्टिफिकेट व रु.२५०/- रोख मिळाले. तसेच सौ. दिपा राक्षे व सौ. चारुशिला वंडेकर यांना आदर्श शिक्षक स्मृतिचिन्ह मिळाले. शाळेलाही आदर्श पुरस्कार मिळाला. पुरस्काराचे स्वरुपात स्मृतिचिन्ह व सर्टिफिकेट मिळाले.

✻ कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे आयोजित केलेल्या विज्ञान प्रदर्शनात 'रेन वॉटर हार्वेस्टिंग' हा विषय घेऊन शाळेतील शिक्षिका सौ. शेंडे व सौ. वंडेकर यांनी शाळेच्या वतीने सहभाग घेतला.

✻ कै. य. वि. भातखंडे पुरस्कृत २०१३ आदर्श शिक्षक पुरस्कार शाळेच्या शिक्षिका सौ. ज्योती पवार यांना प्राप्त झाला हा पुरस्कार संस्थेतर्फे दिला जातो.

✻ इ. ४ थी ची अभ्यास विषयक सहल बदलापूर येथील विष्णूबाग येथे नेण्यात आली.

शाळेचे वाचनालय असून वाचनालयात शिक्षक, पालक व विद्यार्थी यांच्यासाठी सुमारे ३,००० चांगली पुस्तके असून ज्या पालकांना त्याचा लाभ घ्यावयाचा आहे त्यांनी रु. १००/- अनामत रक्कम देऊन सभासद व्हावे. यंदाच्यावर्षी वाचनालयासाठी पालकांचा सहभाग चांगला लाभला.

शिक्षक-पालक संघ व शाळा व्यवस्थापन समिती मधील पालक प्रतिनिधींचे शाळेच्या प्रगतीसाठी वेळोवेळी सहकार्य लाभत असते.

पालक आपल्या पाल्याच्या वाढदिवसानिमित्त ११ रुपयांपासून २०१ रुपयापर्यंत देणगी देतात. त्या

देणगीतून शाळेला आवश्यक असणारे शैक्षणिक साहित्य घेतले जाते.

⁂ शाळेवरील प्रेमापोटी काही हितचिंतक, माजी पालक यांनी शाळेला इलेक्ट्रिक पंखे भेट दिले.

डॉ. श्री./सौ. मोघे, श्री. डी. एस. कुलकर्णी, लिबर्टी स्टोअर्स, श्री. घाटे, श्री. मयूर फेणडे, श्री. खैरनार, सौ. सीमा गोखले हे शाळेला आर्थिक मदत करतात शाळा त्यांची ऋणी आहे.

⁂ १३ वी जिल्हास्तरीय तायक्वांडो २० किलो वजनी गटात कु. मधुरा अवधूत ओक हिला कांस्यपदक मिळाले.

⁂ महानगरपालिका क्षेत्र जिल्हास्तरीय क्रिडा स्पर्धा व कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरशालेय तायक्वांडो स्पर्धेत २० कि. ग्रॅ.वजनी गटात कु. मधुरा अवधूत ओक (इ. ४ ड) हिला सुवर्णपदक व सन्मानपत्र मिळाले.

कु. आर्यन रणजित उगले (इ. ४ थी ड) याला रौप्यपदक व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

⁂ नॅशनल लेव्हल ब्रेन डेव्हल्पमेंट स्कॉलरशिप एक्झामिनेशन २०१३ इ. ३ री च्या गटातून डोंबिवली केंद्रात कु. मधुरा अवधूत ओक हिचा ५ वा क्रमांक आला असून तिला सिल्व्हर मेडल प्राप्त झाले.

⁂ शिक्षक पालक संघातर्फे दि. १६ मार्च २०१३ रोजी शिक्षक पालकांच्या स्पर्धा घेण्यात आल्या त्यात खालील शिक्षक व पालकांना बक्षीस प्राप्त झाले.

⁂ स्ट्रॉ ने मटार उचलणे - १) सौ. प्रज्ञा नहिंदे, २) सौ. प्रियदर्शनी पष्टे,
३) सौ. रसिका जांभुळकर उत्तेजनार्थ - सौ. मोहिनी दुधारकर

**⁂ कडधान्य ओळखणे स्पर्धा (पुरुषगट) १) श्री. संदिप पळणीटकर, २) श्री. राजेश आंबवणे, ३) श्री. जयंत पोतदार**

**⁂ स्मरणशक्ती स्पर्धा - १) सौ. दर्शना आंबवणे, २) सौ. मोहिनी दुधारकर व सौ. चारूशिला वंडेकर, सौ. संगीता कटकधोंड, ३) सौ. ज्योती पवार.**

**८ मार्च २०१३ महिला दिनानिमित्त 'महिला सबलीकरण व पालकत्व' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मानसोपचार तज्ज्ञ सौ. वृषाली आठल्ये यांनी मार्गदर्शन केले व वरील स्पर्धेची बक्षिसे त्यांच्या हस्ते देण्यात आली.**

**अशाप्रकारे आपल्या विशाल वटवृक्षाला समृद्धी व यशाच्या उत्तुंग शिखराकडे वाटचाल करण्यासाठी संस्था व शिक्षक सतत प्रयत्न करीत असतात त्यास यश मिळो हीच ईश्वर चरणी प्रार्थना!**

**सौ. प्रज्ञा प्रमोद मोने**
**मुख्याध्यापिका,**
**ज. ए. इ. ची प्राथमिक शाळा(सुभेदारवाडा)**

**संकलन :- सौ. प्रियदर्शनी प्रकाश पष्टे**
**(साहाय्यक शिक्षिका)**